**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.6** **July-Aug 2023**

# महिला आदिवासी विकास आणि आदिवासी उपयोजनाचे अध्ययन

**डॉ. मानसी कुर्तकोटी[1] दुर्गा चंद्रकांत दुसाने[2]**
[1]मार्गदर्शक, डॉ. डी वाय पाटील, कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,पिंपरी .
[2] संशोधक, अर्थशास्त्र संशोधन केंद्र, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी, पुणे.
**Corresponding Author- डॉ. मानसी कुर्तकोटी**
**Email – durgadusane१@gmail.com**
**DOI- 10.5281/zenodo.8373416**

**प्रस्तावना –**

आदिवासी उपयोजनेची मूळ संकल्पना ही प्रामुख्याने क्षेत्र विकासाच्या संकल्पनेवर आधारित आहे. आदिवासी लोकसंख्या जास्त प्रमाणात असलेल्या अनुसूचित क्षेत्राचे विशेष विकास गट, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तयार करणे, प्रत्येक प्रकल्पात आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासींच्या विकासासाठी खर्च करणे, त्यानुसार आदिवासींच्या विकासासाठी मुलभूत सोयी सुविधा निर्माण करणे, त्यासाठी निधीचे नियोजन व त्यावरील नियंत्रण राबाविण्याच्या विविध योजना व त्यासाठीच्या हिशेबाच्या तरतुदी या पद्धतीनुसार दरवर्षी आदिवासी उपयोजनेअंतर्गत विविध विकास योजना राबविण्यात येतात.

आदिवासी लोकसंख्या ही धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पालघर, ठाणे, रायगड, अहमदनगर व पुणे या पश्चिम डोंगरी जिल्ह्यामध्ये सह्याद्री प्रदेश आणि चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, अमरावती यवतमाळ व नांदेड या पूर्वेकडील जंगल व्याप्त जिल्ह्यामध्ये गोंडवाना प्रदेश मोठ्या प्रमाणात केंद्रित झाली आहे. भारत सरकारच्या निर्देशानुसार राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या घनतेवर आधारित २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, ४३ सुधारित क्षेत्र विकास खंड, माडावर २४ लघु सुधारित क्षेत्र विकास खंड मिनी माळा तयार करण्यात आले आहेत. आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा क्षेत्र वाहिनी, माडा क्षेत्रात आदिवासी क्षेत्राबाहेर वास्तव्य करणाऱ्या आदिवासी समुदायाच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

**शोधनिबधाचे महत्त्व -**

आर्थिक विकास हा देशाच्या सर्वांगीण विकासाचा आत्मा आहे. १९९१ नंतर भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केला. जागतिकीकरणाचा फायदा इतर समाज जास्त प्रमाणात उचलताना दिसतो. प्राचीन काळापासून दुबळा असलेला, लोकांची मोलमजुरी करणारा, दुर्गम डोंगराळ भागाम वनराईत वास्तव्य करणारा आणि बारा विश्व दारिद्रयात जीवन जगणारा आदिवासी विभागामार्फत व केंद्र सरकारमार्फत आदिवासींच्या विकासासाठी योजना राबविण्यात येतात. परंतु त्यातून आदिवासींचा विकास का होत नाही? या योजना तळागाळापर्यंत पोहोचतात का ? राज्याच्या अंदाजपत्रकात ९ टक्के खर्च करण्याची तरतुद असूनसुध्दा खर्चाच्या मानाने आदिवासींची प्रगती समाधानकारक का वाटत नाही? विकासाच्या अनेक योजना राबवूनसुध्दा आर्थिक व सामाजिक दरी फार मोठी जाणवते. म्हणून आदिवासी समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांचे व त्यांच्या फलश्रुतीचे अध्ययन व्हावे व त्याचा लाभ तळागाळातील आदिवासी समाजाला मिळावा, आदिवासी समाजाचा आर्थिक व सामाजिक स्तर बळकट व्हावा या दृष्टीकोनातून हा संशोधन विषय महत्त्वाचा आहे.

**शोधनिबधाचे उद्दिष्टे-** संशोधनाची उद्दिष्टे संशोधकाने खालील प्रमाणे मांडली आहेत.

1. महिला आदिवासी विकास या संकल्पनेची मांडणी करणे.
2. महिला आदिवासी विकास योजनांचे स्वरूप विश्लेषित करणे.
3. महिला आदिवासी विकास योजनांची प्रत्यक्ष कार्यवाही व लाभ शोधणे.

**शोधनिबधाचे गृहितके -**गृहितकृत्याचे देखील वास्तविक तथ्यांच्या कसोटीवर परीक्षण केले जाते. संशोधकाने आपल्या अध्ययनातून पुढील गृहितकृत्ये तपासून पाहिली आहेत.

१.आदिवासी विकास योजनांमुळे महिला लाभार्थ्यांच्या राहणीमानात बदल झाला आहे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. आदिवासी महिला लाभार्थ्यांच्या विविध योजनांचे अध्ययन करणे हा प्रमुख उद्देश आहे. निर्धारित केलेल्या संशोधन उद्दिष्टांनुसार संशोधन आराखडा तयार करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन-** प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून पुढील स्त्रोतांचा वापर तथ्य संकलनासाठी केला आहे.

**अ) प्राथमिक तथ्य –** संशोधनकर्ता स्वत: अध्ययन क्षेत्रात जावून त्या विषय किंवा समस्येच्या बाबतीत व्यक्तीकडून किंवा लाभार्थ्याकडून मुलाखत, अनुसूची किंवा प्रश्नावलीच्या सहाय्याने किंवा प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारा जी माहिती किंवा तथ्ये जमा करतो त्यास प्राथमिक तथ्ये असे म्हणतात. प्राथमिक तथ्ये ही स्वत: संशोधनकर्त्याने एकत्रित (संकलित) केली असल्यामुळे ती अधिक वस्तुनिष्ठ असतात. प्राथमिक तथ्य संकलनासाठी पुढील स्त्रोताचा आधार घेतला जातो.

**प्रश्नावली -** प्रस्तुत संशोनात तथ्य संकलन करण्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन विषयाच्या बाबतीत महिला लाभार्थ्याकडून माहिती मिळवण्यासाठी तयार केलेली प्रश्नांची एक क्रमबध्द सूची म्हणजे प्रश्नावली होय. प्रश्नावली ही मिश्रीत प्रकारात समाविष्ट होते. कारण बंद आणि मुक्त अशा दोन्ही प्रकारच्या प्रश्नांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

**ब) दुय्यम तथ्य -** द्वितीय किंवा दुय्यम तथ्ये ही इतर व्यक्तींनी पुर्वीच गोळा केलेली असून ती लिखीत स्वरूपाची असतात. संशोधनकर्ता या तथ्यांचा आपल्या संशोधनासाठी उपयोग करतो. द्वितीय तथ्ये ही वैयक्तिक प्रलेख व सार्वजनिक प्रलेख या दोन प्रकारची असून संशोधनासाठी सार्वजनिक प्रलेखांचा वापर करण्यात आला आहे. संदर्भ ग्रंथ, शासकीय पत्रके, परिपत्रके, दस्तऐवज, आदिवासी विकास विभागाचे अहवाल, सांख्यिकी माहिती, वर्तमानपत्रे, मासिके या घटकांचा वापर केला आहे.

**महिला आदिवासी लाभार्थ्यांची नमुना निवड -**उत्तर महाराष्ट्रातील नाशिक जिल्हयातील आदिवासी महिला लाभार्थ्यांची संशोधनासाठी निवड करताना साधा यादृच्छिक नमुना निवडीच्या प्रकारातील नियमित अंकन पद्धतीचा वापर केला आहे. आदिवासी विकास योजनांच्या लाभार्थी सुचीच्या आधारे निवड करण्यात आली.

**आदिवासी उपयोजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य -** आदिवासी क्षेत्राच्या पायाभूत विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना निधी म्हणून केंद्र शासनाकडून दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या विशेष केंद्रीय सहाय्य प्राप्त होते. दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीपासून केंद्र शासनाकडून मिळालेले विशेष केंद्रीय सहाय्य व झालेला खर्च खालील तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता क्रमांक १ आदिवासी उपयोजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य ( रक्कमरू. लाखात)

| वर्ष | मंजूर रक्कम (रू. लाखात) | टक्केवारी | वाढ/घट |
|---|---|---|---|
| २००८-०९ | २५००.०० | ३.१ | - |
| २००९-१० | ८९५.९१ | १.२ | -१६०४.०९ |
| २०१०-११ | ५७९६.०० | ७.३ | ४९००.०९ |
| २०११-१२ | ७०५५.९३ | ८.९ | १२५९.९३ |
| २०१२-१३ | ७३४०.५० | ९.३ | २८४.५७ |
| २०१३-१४ | ७७२८.०० | ९.८ | ३८७.५० |
| २०१४-१५ | ११७२६.१८ | १४.९ | ३९९८.१८ |
| २०१५-१६ | १२५१४.९१ | १५.९ | ७८८.७३ |
| २०१६-१७ | ९५४७.०० | १२.२ | -२९६७.९१ |
| २०१७-१८ | १३७६०.३८ | १७.४ | ४२१३.३८ |
| एकूण | ७८८६४.८१ | १०० | ११२६०.३८ |

**स्त्रोत- कार्यक्रम अंदाजपत्रक (२००८-९ ते २०१७-१८), आदिवासी विकास विभाग आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्र मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर.**

तक्ता क्रमांक १ मध्ये आदिवासी उपयोजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य याबाबतचे अध्ययन करण्यात आले आहे. २००८- ०९ ते २०१७-१८ या संशोधन काळात आदिवासी उपयोजनेसाठी एकूण ७८८६४.८१ लाख रु. मंजूर करण्यात आले आहे. आदिवासींच्या विकासासाठी सर्वाधिक रकमेची तरतूद २०१७-१८ मध्ये १३७६०.३८(१७.४ टक्के) करण्यात आली असून सर्वात कमी तरतूद २००९-१० मध्ये ८९५.९१ लाख रु.(१.२ टक्के)असल्याचे दिसून आले आहे. अभ्यासकाळात आदिवासींसाठी विशेष केंद्रीय सहाय्य ११२६०.३८ लाख रु. इतके वाढले आहे.

**महत्त्वाचे निष्कर्ष –**

1. नमुना महिला आदिवासी लाभार्थ्यांपैकी विकासात्मक योजनांची माहिती मिळण्याचा प्रमुख स्रोत प्रकल्प कार्यालय असून त्यासाठी सर्वाधिक ५४.३ टक्के लाभार्थ्यांनी प्रतिसाद नोंदविला आहे. तर ग्रामपंचायत १४.५ टक्के,प्रसारमाध्यमे १६.२ टक्के, स्वयंसेवी संस्था १५.० टक्के यांच्याकडून आदिवासींना विकासात्मक योजनांची माहिती उपलब्ध होत असल्याचे दिसून आले आहे.
2. आदिवासी महिला लाभार्थ्यांना सर्वाधिक वस्तीगृह योजना, आश्रमशाळा योजना, शेतकऱ्यांना तेल पंप व वीज पंप पुरवठा,सिंचनासाठी एच.डी.पी.ई पाईपपुरवठा, सुवर्णजयंती पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना, सेवा योजना व नाव नोंदणी, कन्यादान, दुधाळ जनावरे वाटप,घरकुल योजना, खावटी कर्ज योजना व पारधी समाजासाठीच्या योजनांचे सर्वाधिक लाभ झाले आहेत.
3. आदिवासी महिला लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ ३७.१ टक्के झाला असून निवारा उपलब्धता २२.६ टक्के हा फायदा सर्वाधिक लाभार्थ्यांनी घेतला तर ६.१ टक्के मध्यमवर्गीय कुटुंबांना अल्प लाभ झाल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. नमुना ३४.२ टक्के आदिवासींना घरकुल योजनेचा लाभ होऊ शकला नाही असे संशोधनातून दिसून येते.
4. आदिवासी महिला लाभार्थ्यांची ७७.५ टक्के आदिवासी लाभार्थ्याला घरगुती गॅस योजनेतून गॅसचा पुरवठा झाला असून अजूनही २२.५ टक्के आदिवासी लाभार्थ्यांना गॅस योजनेचा फायदा झाला नाही.सर्वाधिक ६१.६ टक्के लाभार्थ्यांनी वृक्षतोड थांबविण्यासाठी ही योजना महत्त्वाची असून या योजनेत अपहार व भ्रष्टाचार होत असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे.
5. शासनाकडून योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणी बाबत नमुना ३२.३ टक्के महिला आदिवासी लाभार्थी सहमत,सर्वाधिक ५४.५ टक्के महिला लाभार्थी अहसमत,तर १३.२ टक्के महिला लाभार्थी तटस्थ असल्याचे आढळून आले आहे.

**शिफारसी** – संशोधनातून ज्या बाबी कमकुवत दिसून आल्या आहेत त्या सुधारण्यासाठी पुढील शिफारशी मांडल्या आहेत.

1. आदिवासी विकासासाठी केंद्र व राज्य सरकारने दिलेला निधी खर्च करण्याची जबाबदारी ग्रामसभेवर असावी त्याचे आर्थिक मूल्यांकन करावे.
2. आदिवासीमध्ये स्वयंरोजगाराची क्षमता निर्माण करण्यासाठी व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
3. आदिवासींसाठी असणाऱ्या राखीव जागावर नोकरीसाठी कुटुंबातील एकाच व्यक्तीला लाभ द्यावा.
4. आदिवासी समाजाला प्रगत समाजात आणण्यासाठी स्त्री शिक्षणाला प्राधान्य द्यावे.
5. आदिवासी विकास योजनांचे लाभ पदरात पाडून घेण्यासाठी स्वतः आदिवासी समाजाने जागरूक असावे.शोषित,दलित, पीडित गटातील व्यक्तीमध्ये एकीचे बळ असावे.
6. आदिवासी विकास योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी योजनांची माहिती देणारी यंत्रणा सक्षम असावी. उदासीन,कामचुकार अधिकारी व कर्मचारी यांच्यात आदीवासींच्या विकासाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी प्रेरणा व उत्तेजन द्यावे.
7. आदिवासी कुटुंबातील तरुणांना थेट उत्पन्न प्राप्तीचे स्रोत सरकारने उपलब्ध करून द्यावेत.
8. आदिवासींनी निर्माण केलेल्या हस्त कौशल्याच्या वस्तूंचे प्रदर्शन व मेळावे आयोजित करणे, तसेच वस्तू विक्रय कलेचे प्रशिक्षण त्यांना द्यावे.
9. घरगुती गॅसवरील अनुदान पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र सरकारने निर्णय घेऊन त्याची त्वरित अंमलबजावणी करावी.

10. आदिवासींच्या गरजा लक्षात घेऊन शेती,जलसिंचन,उद्योग,दळणवळण साधने, शिक्षण, आरोग्यविषयक नवीन योजनांची निर्मिती करावी.

**संदर्भसूची -**


1. खडसे भा. कि. (२००२), ' जाती व वर्ग; भारतीय आदिवासी ' ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. पान नं- १८ ते ४२.
2. आगलावे प्रदिप ( फेब्रुवारी २०११), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र , श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. पान नं. – १ ते ४.
3. देवगावकर एस.जी. ( फेब्रुवारी २०११), आदिवासी विकास प्रकाशन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. पान नं. – ५.
4. सवदी ए.बी. (एप्रिल २०१७) 'द मेगा स्टेट महाराष्ट्र' निराली प्रकाशन, पुणे. पान नं. १५.५० ते १५.५२
5. Census of Maharashtra (२०११) Director of Census Operations Maharashtra.